# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/४३६३ /२०१९

पुणे शहर, दिनांक ०८/०५/२०१९

**विषय :- दुचाकी वाहनचालकांनी हेल्मेट परिधान करुन हेल्मेटची स्ट्रॅप/बेल्ट बसविण्याबाबतचे अवाहन.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमीत प्रयत्न करण्यात येत असून, वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामध्ये दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट परिधान न केल्यामुळे प्राणांतिक अपघात होत आहेत. शहरात दोन अपघातामध्ये वाहन चालकांनी हेल्मेट घातले होते परंतु हेल्मेटची स्ट्रॅप/बेल्ट न लावल्यामुळे ते रोडवर पडुन हेल्मेट बाजुला पडल्याने गंभीर जखमी होवुन मयत झाले आहे

दिनांक-३०/०४/२०१९ रोजी १०.५५ वा. किर्लोस्कर ब्रीज कडुन हडपसरकडे जात असताना रोडवर पुणे येथे मोटार सायकलचालक महिलेस टँकर चालकाने धडक दिल्याने त्या गंभीर जखमी होऊन मयत झाल्या आहे.

तसेच दिनांक- ०७/०५/२०१९ रोजी रात्रौ १२.१५ वा. सुमा. चांदणी गार्डनसमोर पुणे बँगलोर रोड वडगाव ब्रीजचे सर्व्हिस रोडवर अज्ञात ट्रक चालकाने मोटार सायकल स्वारास धडक दिल्याने मोटार सायकल चालक हा गंभीर जखमी होऊन मयत झाला आहे.

तरी वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट परिधान करुन हेल्मेटची स्ट्रॅप/बेल्ट बसवावी. वाहन चालविताना वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष केल्याने आपल्या स्वतःचे तसेच दुस-याचे जिवीतास धोका निर्माण होतो, त्याकरीता वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे तसेच दुचाकी वाहन चालविणा-या चालकाने व दुचाकीवरील सहप्रवाशी यांनीही आपल्या जिवीताचे सुरक्षीतता करीता हेल्मेट परिधान करावे.